| MHSN060000491989 | **नियमित दिवाणी दावा : ७९/१९८९**<br>शामराव पोवार (मयत) तर्फे वारस वि.<br>श्रीमती. हौसाबाई चव्हाण (मयत) तर्फे वारस |
|---|---|

## निशाणी १६८ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाखल केला असून त्यांचे कथनानुसार प्रस्तुत दावेमधील प्रतिवादी क्र.१/२ पांडुरंग श्रीपती चव्हाण हे दि.१६/०९/२०२० रोजी तसेच प्रतिवादी क्र.१/३ गोरखनाथ श्रीपती चव्हाण हे दि.१५/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. मुदतीच्या कायद्यानुसार ९० दिवसांचे आत मयताचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. परंतु मुदतीत वारस रेकॉर्डवर आणले नसल्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१/२ व १/३ यांचे विरुध्द दावा अबेट झाला आहे. तसेच वादी क्र.२/१ काशीबाई यशवंत पवार या दि.१९/०१/२०२२ रोजी व प्रतिवादी क्र.१/४/१ पद्मीनी ज्ञानदेव चव्हाण या दि.०५/०६/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. तथापि त्यांचे विरुध्द देखील दावा अबेट झालेला आहे. सदरहू मयताच्या वारसांना दावेकामी सामील करुन घेणे कायदयाने व न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादीस मयत प्रतिवादी क्र.१/२ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस सुमारे ३ वर्षे १० महिने, तसेच प्रतिवादी क्र.१/३ चे वारस रेकॉर्डवर आणणेस सुमारे २ वर्षे ३ महिन्यांचा विलंब झालेला आहे. तसेच वादी क्र.२/१ व प्रतिवादी क्र.१/४/१ यांचे बाबतही उशीर झालेला आहे. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरिता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१/२, १/३ यांनी नि.१७१ कडे व प्रतिवादी क्र.१/२(क) यांनी नि.१७२ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज मंजूर करणेस त्यांची काहीही हरकत नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१.६ यांनी नि.१७७ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे कथनानुसार, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१/२ हे मयत होऊन तीन वर्षांपेक्षा तसेच प्रतिवादी क्र.१/३ हे

मयत होऊन दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाला आहे. तसेच सदर मयत प्रतिवादींचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणले नाहीत याबाबत वादी यांनी कोणतेही संतोषजनक कारण किंवा पुरावा दिलेला नाही. वादींनी अर्जात नमूद केलेली कारणे ही फक्त औपचारिक आहेत. वास्तविक वादी यांचे निष्काळजीपणामुळे सदरचा विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली. तसेच मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आलेस वादी यांना जास्तीत जास्त खर्च बसविणेत यावा अशी त्यांनी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दाव्याची पाहणी केली. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द पूर्वी दाखल केलेला रे.दि.मु.नं.२१३/१९६५ हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ रुल ३ मधील तरतुदीनुसार ९० दिवसाचे आत मयताचे वारस रेकॉर्डवर आणणे कायदयाने क्रमप्राप्त आहे. याकामी प्रस्तावित वादी यांना मयत प्रतिवादी क्र.१/२ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस सुमारे ३ वर्षे १० महिने, तसेच प्रतिवादी क्र.१/३ चे वारस रेकॉर्डवर आणणेस सुमारे २ वर्षे ३ महिन्यांचा विलंब झाल्याचे दिसून येते. तसेच सदर दावेचे अपील चालू असल्यामुळे व त्यानंतर अनावधानाने मयत प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर आणणेस वादी यांना उशीर झाल्याचे दिसून येते. तथापि, दाव्याचे कारण हे प्रतिवादी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांच्या वतीनेही जिवंत (Survive) राहते. त्यामुळे मयत प्रतिवादींचे वारस याकामी आवश्यक पक्षकार होतात. दावेकामी प्रतिवादी यांची उपस्थिती कायदयाने आवश्यक असल्याने अर्जात नमूद केलेले कारण योग्य व संयुक्तीक वाटते. त्यामुळे झालेल्या विलंबाबाबत वादी यांना र.रु. २,०००/- कॉस्ट बसवून सदर मयत प्रतिवादी क्र.१/२ व १/३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेची परवानगी वादींना देणे न्यायोचित होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१/२ व १/३ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकामी झालेल्या विलंब माफ करण्यात येतो. त्याकरिता वादी यांनी प्रतिवादी क्र.१.६ यांना र.रु. १,०००/- खर्च दयावा व उर्वरीत र.रु.१,०००/- तालुका विधी सेवा समिती, मिरज यांचेकडे जमा करावेत.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN

मिरज **(निरंजन बा. चव्हाण)**

दिनांक : ०५/०२/२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मिरज.

*****

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 05.02.2025. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 05.02.2025. |
| Order uploaded on. | : | 06.02.2025. |